# प्रस्तावना

चाचणी लेखापरीक्षा आणि दक्षता अधिकारी हा एक स्वतंत्र दक्षता कक्ष आहे. सदर कक्ष मान. सह-आयुक्त (सुधार) / मान. महानगरपालिका आयुक्त यांच्या थेट नियंत्रणाखाली कार्यरत आहे. दक्षता कक्षाची प्रमुख कामे आस्थापना / महसूल / व्यय / घन कचरा व्यवस्थापन इत्यादी संबंधातील बाबींची चाचणी तत्वावर तपासणी करणे. सदर तपासणीमध्ये निदर्शनास आलेल्या अनियमितता / प्रशासकीय त्रुटी /आर्थिक गैरव्यवहार इत्यादी बाबी  नमूद करून अहवाल सक्षम प्राधिका-यांना सादर करण्यात येतो. या अहवालामध्ये आवश्यकतेनुसार सुधारात्मक उपाययोजना सुचविण्यात येतात. तसेच दोषी कर्मचा-यांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी देखील प्रस्ताविण्यात येते.

वेगवेगळया संस्थांकडून निर्गमित केलेल्या अर्धसमास व  लेखा परिच्छेदांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यासाठी लेखा टिप्पण्या पाठपुरावा कक्ष जुलै 2013 मध्ये अस्तित्वात आला आहे. प्रलंबित लेखा परिच्छेदांचा निपटारा करण्यासाठी नियमित पाठपुरावा करण्यात येतो.

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम -2005 अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पुढील अनुक्रमांक 1 ते 17 मॅन्युअल्समध्ये, चाचणी लेखापरीक्षा व दक्षता अधिकारी या कक्षामार्फत पार पाडीत असलेले कामकाज तसेच विविध उपक्रम इत्यादी सविस्तर माहिती देण्यात आली आहे.